# हळबे महाविद्यालयात एनसीसी दिनानिमित्त व्याख्यान

**दोडामार्ग : पुढारी वृत्तसेवा**

हळबे महाविद्यालयात एनसीसी दिनाचे औचित्य साधून लष्कर व्यवस्थापन या विषयावर माजी सैनिक कॅप्टन प्रसाद गवस यांचे व्याख्यान कार्यक्रम नुकताच झाले.

२७ नोहेंबरला एनसीसी दिन देशभरात शाळा, महाविद्यालयात साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात छात्र सैनिकांमध्ये देश भक्तीची प्रेरणा आणि नव चेतना निर्माण करण्यासाठी व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी 'भारतीय सैन्य व्यवस्थापन आणि कार्य' या विषयावर कॅप्टन प्रसाद गवस यांचे व्याख्यान झाले. भारतीय सैनिक कार्य पद्धती आणि संपूर्ण व्यवस्थापन यंत्रणा याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच छात्र सैनिकांना आपल्या कार्य नेतृत्वाची आवड आणि अभिमान असणे गरजेचे आहे, तरच तो या क्षेत्रात आपले योगदान सकारात्मक पद्धतीने देवू शकतो असे वक्तव्य व्यक्त केले.प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी शालेय जीवनातील एन.सी.सी.च्या आठवणींना उजाळा दिला. एन.सी.सी. करिअरच्या दृष्टिकोनातून किती महत्वाचे आहे? तसेच एन.सी.सी.बी आणि सी प्रमाणपत्र याचे महत्व काय हे छात्र सैनिकांना सांगितले. कार्यक्रमात छात्र सैनिकांचा बी परीक्षा प्रमाणपत्र आणि रँक देऊन गौरवकरण्यात आला. प्रास्ताविक लेफ्ट. प्रा. डॉ. पी. एन. ढेपे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.दिलीप बर्वे तर आभार प्रा.डॉ. एस. एस. पाडगावकर यांनी मानले.



हळबे महाविद्यालयात एनसीसी दिनानिमित्त दीपप्रज्वलन करताना कॅप्टन प्रसाद गवस. सोबत प्राचार्य डॉ. सुभाष सावंत व इतर.